# भूमिपुत्रांचे बाबासाहेब : एक आकलन

**प्रा. डॉ. सुनील अभिमान अवचार,** मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ,मुंबई

**तुषार दिपक मांडवकर,** संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई. ईमेल- awacharsunil@yahoo.com

---

**प्रस्तावना -**

'भूमिपुत्रांचे बाबसाहेब' ही चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वव्यापी व्यक्तिमत्वावर लिहिलेली दीर्घ कविता आहे. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र हे महाकाव्याचा स्रोत आहे. आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेकर यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध विविधांगी पद्धतीने घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये कायदेतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ अशा विविध पैलूंची चर्चा करण्यात आली आहे. जागतिक काव्य इतिहासामध्ये देव, प्रेषित यांच्यावरच काव्यानिर्मिती झालेली आहे. मराठी तसेच इतर भारतीय भाषांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र, त्यांचे विचार यांच्यावर असंख्य कविता लिहिण्यात आल्या आहेत. जात्यावरच्या ओव्या ते मुक्तछंद, शाहीरी, रॅप, चित्रपट, कथा , कादंबरी, शिल्पकला या सगळ्या फॉर्म मध्ये तसेच दृश्यकलेमध्ये डॉ. बाबासाहेब यांच्या बहूआयामी व्यक्तिमत्वाचा वेध घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधांत 'भूमिपुत्रांचे बाबासाहेब' या दीर्घ कवितेतून शेतकरी, शेतमजूर, बहुजन, सर्वहारा वर्गातील समुहाचे चित्रण कसे आले आहे त्याचा परामर्श घ्यावयाचा प्रयत्न केला आहे.

**कवीची भूमिका –**

'भूमिपुत्रांचे बाबासाहेब' या कवितेतून चंद्रशेखर मलकमपट्टे यांनीडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैश्विक कार्याचा पट वाचकांसमोर उभा केला आहे. बाबासाहेबांना एका पिंजऱ्यात बांधण्याचे काम आपल्यातल्याच काही लोकांनी केले. त्या पिंजऱ्याचा तुरुंग तोडून मुक्त निळ्या आभाळात उडणाऱ्या पाखराचे वर्णन करावे तसाच हा कवी बाबासाहेबांच्या अखंड कार्याचे वर्णन आपल्या शब्दांच्या माध्यमातून करतो. कवी आपल्या मनोगतात म्हणतो – **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महामानवाचे महानत्व आणि व्यापकत्व जाणीवपूर्वक समाजातल्या काही मूठभर समूहांनी सीमित केले आहे. त्यांचे सर्व स्तरांच्या उत्थानाचे कार्य व्यवस्थितपणे झाकून ठेवून त्यांच्याकडे केवळ 'दलितांचे कैवारी', 'दलितांचे पुढारी' आणि 'राज्यघटनेचे शिल्पकार' म्हणूनच पाहिले गेले. परंतु या दृष्टीने त्यांच्या कार्याकडे नि व्यक्तिमत्वाकडे पाहणे म्हणजे त्यांच्या उत्तुंग आणि सर्वव्यापी कार्याकडे दुर्लक्ष करणे होय."**[१] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या चौकटीत बांधू पाहत आहेत त्या चौकटीपल्याड जाऊन बाबासाहेबांवर एका जातीचे असण्याचा शिक्का मारणा-यांना कवी चंद्रशेखर मलकमपट्टे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैश्विक विचारांची, वैश्विक कार्याची नोंद घ्यायला भाग पाडतात.

**भूमिपुत्रांचे बाबासाहेब या कवितेचे रसग्रहण -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवावर आजवर असंख्य कवींनी कविता लिहिल्या आहेत. १९६० पासूनच जवळजवळ सर्वच दलित आणि काही दलितेतर कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कविता लिहिल्या. नामदेव ढसाळांसारखे कवी 'तुझे बोट धरून चाललो आहे' असे म्हणत आज त्यांचे जे अस्तित्व निर्माण झाले ते अस्तित्व निर्माण करण्याचे पूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेबांना देतात. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी प्रभावित होऊन लिहिणाऱ्याची एक परंपराच मराठीत निर्माण झाली. या परंपरेमुळे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार झाला आणि या विचारांतूनच वेदना, विद्रोह, नकार यांची चौकट निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना फक्त या तीन सूत्रांत बांधता येईल का ? असा प्रश्न नक्कीच निर्माण होतो. कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी भूमिपुत्रांचे बाबासाहेब या दिर्घकाव्यसंग्रहात याच प्रश्नाचा शोध घेण्याचे अतिशय महत्वाचे काम केले आहे. आणि म्हणूनच कवी म्हणतो –**"दरवर्षी/चौदा एप्रिललाच यांना येणार/महामानवाची याद/पवित्र पंचशील फडकवून/ते पिटतात हाकाटी –/बाबासाहेब,/म्हणजे दलितांचे कैवारी/बाबासाहेब,/म्हणजे घटनेचे शिल्पकार/याच्या पलीकडचा आंबेडकर/कोण सांगणार ?/वर्षानुवर्षे/घातला जातोय रतीब/त्याच उच्चारांचा/आणि/अडकवलं जातंय तुम्हाला/एका चौकटीत, पद्धतशीरपणे...../षडयंत्र.....!/ठरवून रचलेलं षडयंत्र...."**[२] कवी ज्या आत्मतीव्र भावनेने जे सांगू पाहतो आहे त्याचा गाभा जर आपण लक्षात घेतला तर बुद्ध – फुले – आंबेडकर या प्रवासातील अर्थ आपल्याला उलगडत जाईल. या अखंड मानवतेच्या प्रवासात माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळवून देणारा एक निळा अवकाश आपल्याला दिसेल. त्या अवकाशाखाली आपले दुःख मांडू पाहणारा माणूस आहे. त्यात कोणतीही जात, धर्म वा कोणताही प्रांत आपल्याला दिसणार नाही. मानवतेचे गीत गाणारा माणूसच आपल्याला दिसेल. आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे

शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढले, स्त्रियांना अस्तित्व मिळवून देण्यासाठी लढले आणि शूद्रातिशूद्र म्हणजेच समग्र शोषितांच्या शोषणमुक्तीसाठी लढले. कवी चंद्रशेखर मलकमपट्टे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र लढ्याची कहाणी या कवितासंग्रहात सांगतात. या कवितेतील जो संघर्ष कवीने मांडला आहे तो संघर्ष – गुलामगिरी विरुद्ध मुक्तीचा, शेतकरी विरुद्ध सावकार, स्त्री विरुद्ध पुरुषसत्ताक व्यवस्था तर कधी कधी मुखवटा घातलेल्या आंबेडकरी चळवळी विरुद्धचाही संघर्ष आहे. हा संघर्ष कवीचा स्वतःशीदेखील आहे, न समजलेले डॉ. बाबासाहेब समजून घेण्याचा हा संघर्ष आहे. आणि म्हणूनच कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांची कविता ही वास्तववादी भूमिका घेऊन बोलणारी कविता आहे असे म्हणता येते. या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात – **"भूमिपुत्राची कविता मधील भूमिपुत्र ही संज्ञा केवळ शेतकरी या शब्दापुरती मर्यादित नाही. आय हॅव नो होमलँड असे बाबासाहेब महात्मा गांधी यांना म्हणाले होते. त्या वाक्यातला आय म्हणजे केवळ बाबासाहेब नव्हते. आय म्हणजे देशातील कोट्यवधी अन्यायग्रस्तांचे आक्रंदन आहे. हा अन्यायग्रस्त, बहिष्कृत, उपेक्षित, शोषित – पीडित भारताचा आय आहे. खुद्द हा भारतच बाबासाहेबांच्या मुखाने आय हॅव नो होमलँड म्हणत आहे."**[३] म्हणजेच बाबासाहेब हे कोण्या एका समाजाचे नेतृत्व करत नव्हते तर अखंड भारताचे, शोषित – पीडित माणसांचे नेतृत्व करीत होते. ज्या मूठभर लोकांच्या हातात इथल्या सत्तेच्या चाव्या आहेत त्या मूठभर लोकांनी जी गुलामगिरीची व्यवस्था निर्माण केली. त्या व्यवस्थेला उद्धवस्त करून मुक्तीची कवाडे उघडी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल लिहिताना कवी म्हणतो,**"नकोय मला मुठभर भटजींचं राज्य/तर राज्य हवंय तुम्हा ऐंशी टक्के लोकांचं/हजारोंचा जनसमुदाय ओरडला –/आम्हाला मिळाला आमचा नेता/डॉ. भीमराव आंबेडकरांचा विजय असो !/फुलत गेला स्वतंत्र मजूर पक्षाचा मळा"**[४] म्हणजेच आण्णाभाऊ साठे ज्याप्रमाणे म्हणाले की – "ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर उभी नसून ती इथल्या शोषित, श्रमिक मजुरांच्या तळहातावर उभी आहे." ही प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून मिळाली आहे. कवी उपरोक्त ओळीतून कामगारांच्या प्रति असणारी बाबासाहेबांची आत्मिक भावना प्रकट करताना कामगारांचा जो लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उभा करतात त्याचे वर्णन याठिकाणी कवी करतो आहे आणि यासाठी चिपळूण मधील कुळांच्या सभेतील दिलेला संदर्भ हा अतिशय महत्वाचा ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक संदर्भ या कवितेत येतात. या कवितेचा आरंभ शेतकऱ्यांच्या शोषणापासून होतो त्यावेळी शेतकऱ्यांसाठी "कृषी मूलंहि जीवनम्" या शब्दातून शेती हा जीवनाचा पाया आहे हे सांगणारे बाबासाहेब बळीराजा मातीत गाडला जातोय ही भावना व्यक्त करताना कवी म्हणतो –**"इथं अख्खा बळीवंश/गाडला जातोय मातीत/त्याची नाही कुणाला चिंता"**[५] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करणारे कोणी नाही ही खंतही कवी व्यक्त करतो आहे. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भाष्य करताना 'शेतकऱ्यांचा आसूड' होऊन इथल्या भटशाही, सावकारी, पुरोहितशाही यांना जाब विचारला. कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महात्मा फुलेंशी असणारे नाते तीव्र वैचारिक भावनेने मांडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुलेंना गुरु मानतात आणि हाच गुरू – शिष्याचा धागा कवीने या संबंध कवितेत मांडलेला पहायला मिळतो. ही मानवतेची परंपरा जपणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्ध – फुले यांच्या मार्गावर अखंड प्रवास करतात त्या प्रवासाचे धागेदोरे चिकित्सक बुद्धीने कवी चंद्रशेखर मलकमपट्टे शोधू पाहतात हाच आशयगाभा या कवितेचा आहे. आणि म्हणूनच या कविता संग्रहाच्या सुरवातीला संत तुकारामांचा अभंग सांगून कवी पुढे कविता लिहिताना म्हणतो –**"तूच तुकोबाचा अंश/तुझा ज्योतिबाचा वंश/तुझं कबीराशी नातं/राजा सिद्धार्थाची रीत"**[६] मानवतेसाठी लढणाऱ्यांची एक परंपरा कवी सांगू पाहतो आहे आणि या परंपरेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवतेसाठी लढणारे महामानव आहेत हे अधोरेखित केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबरोबरच, कामगारवर्ग, आदिवासी समाज यांचं दुःख मांडलं आहेच. आणि म्हणूनच या सगळ्यांना 'भूमिपुत्र' या एका शब्दांत कवीने वर्णिलेले दिसते. कवी म्हणतो –**"आम्ही रानातले शेतकरी/ते वनातले शेतकरी/आम्हा रानावनातल्याना/का शिरता आलं नाही/तुमच्या भीमबानात ?"**[७] कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी या दीर्घ कविता संग्रहाला एका आकृतिबंध प्राप्त करून दिला आहे एकीकडे स्वतःमधील संघर्ष, त्यानंतर शेतकऱ्यांचे प्रश्न, बारा बलुतेदार त्यातच आदिवासी, त्यानंतर स्त्रिया असा एक आलेख आपल्याला या कवितेत पाहायला मिळतो. हा आलेख कवीने मुक्तछंद व छंदोबद्ध स्वरूपात मांडला आहे. छंदोबद्ध रचना सुरवातीला शेतकऱ्याचं गाणं गात गात पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऋणांचे गीत गाऊ लागते. हे गाणं गाताना यातील लय ही ओवी होताना आपल्याला दिसते. आणि म्हणूनच ओवी गीताच्या माध्यमातून मुक्तीची गाणं गाणारी कविता आणि दुसरीकडे एक कथा काव्यच आपल्याला या दीर्घकाव्यसंग्रहात समाविष्ट झालेले दिसते. कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांचे काव्यात्मक चरित्रच 'भूमिपुत्रांचे बाबासाहेब' या दीर्घ कविता संग्रहात रेखाटले आहे. हे काव्यात्मक चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे आहेच त्याच बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील व कार्यातील प्रगल्भता व सखोलता स्पष्ट करणारे आहे.

स्त्रीमुक्तीचा व स्वातंत्र्याचा विचार पेरणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कवी 'भीमाई'असे बिरूद लावतो. आपल्या कवितेत तो म्हणतो, **"दोन जिवाची बाय माझी/नको उचलूस गं ओझं/असं म्हणणारी जन्मदाती माय.../तुमचं काळीज होतं आईचं/म्हणून तर सारे म्हणतात तुम्हाला भीमाई..."**[८]कवी जेव्हा बाबासाहेबांना आईची उपमा देतो तेव्हा आपल्या लेकरांना योग्य मार्ग दाखवणारे बाबासाहेब डोळ्यासमोर दिसू लागतात कारण आजही हातात संविधान घेऊन मानवतेचा मार्ग दाखवणारे बाबासाहेब समाजासमोर उभे असलेले दिसतात. ब्राम्हणी व्यवस्थेने आखलेली मनुवादी संस्कृतीची इमारत मनुस्मृतीचे दहन करून त्यांनीच उद्धवस्त केली, परंतु आता जी नवी मनुवादी व भांडवलवादी विचारसरणी निर्माण झाली आहे त्यावर कवीने अचूक बोट ठेवले आहे. वर्तमान आणि इतिहास यांची सांगड घालत राजकीय व सामाजिक विवेचन या काव्यात येते त्यातून कवीची सजगता, प्रगल्भता अधिक स्पष्ट होते.

कवीने या दिर्घकाव्याच्या शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल उत्कट प्रेमभावना व्यक्त करताना कवी म्हणतो, **"जळणाऱ्या शेत शिवाराला/पांघरल्या आभाळमायेनं/कोण घेणार आता कुशीत ?"**[९]जेव्हा लहान मूल भुकेने व्याकुळ होतं ना.. तेव्हा ते आपल्या आईच्या कुशीत विसावत असते. कवीला या ओळीतून असाच काही भाव प्रकट करायचा आहे. आत्मप्रियतेने आई आणि मूल यांच्यातील नात्याचा दुरावा, दुःख मांडतो आहे. हे दुःख मांडताना कवी शेवटी म्हणतो आहे**"बाबासाहेब .../आम्ही भूमिपुत्र/समतेच्या उजेडाची/अन/आतुष्याच्या वाटा उजळण्याची/वाट पाहतोय..."**[१०] कारण अजूनही भारतीय समाज हा अंधाराच्या काजळीत स्वतःचे अस्तित्व हरवून बसला आहे. अजूनही धर्म, जात, लिंग, वर्ण आणि वर्ग या विषमतेच्या मुखवट्याखाली स्वतःचा मानवी चेहरा लपवून बसला आहे. मूठभर लोकांची मक्तेदारी असलेल्या इथल्या मूळ भूमिपुत्रांना गुलामीत ठेवून त्यांच्यावर अन्याय अत्याचार केला जात आहे. धर्मव्यवस्था अधिक आपली पकड मजबूत करणाऱ्या या आजच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचारांची खऱ्या अर्थाने गरज आहे याची तीव्र जाणीव कवीने या कवितासंग्रहात व्यक्त केली आहे. ही जाणीव व्यक्त करताना नवभांडवलशाही, जागतिकीकरण व धार्मिक आंधळेपणा यामुळे नैसर्गिक जीवनाला बाजूला सारून एक कृत्रिम जग निर्माण केले जाते आहे हे जग खोट्या कल्पनांवर आधारित आहे. त्या कल्पनांना सुरुंग लावून पुन्हा एकदा मानवी मूल्यांच्या लढाईची सुरवात म्हणजे भूमिपुत्रांचे बाबासाहेब या कवितासंग्रहातील प्रत्येक शब्द आहे.

**समारोप –**

मराठी साहित्यात एखाद्या व्यक्तीवर सर्वात जास्त कविता लिहिल्या गेल्या असतील तर त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लिहिल्या गेल्या आहेत. मराठीतील दिग्गज कवींनी आपापल्या परीने बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बाबासाहेबांचे एकूण जीवन आणि कार्य हे अनेकांना प्रेरणा देणारे ठरले. कवी चंद्रशेखर मलकमपट्टे हेदेखील याला अपवाद नाहीत. त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा केवळ वेध घेणारी कविता लहिली नसून भविष्यात बाबासाहेबांच्या विचारांची प्रस्तुतातही अधोरेखित केली आहे.

**संदर्भ :**

- चंद्रशेखर मलकमपट्टे, भूमिपुत्रांचे बाबासाहेब (काव्यसंग्रह), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. ऑक्टोबर २०२०